फक्त पैशासाठी नाही तर तुमच्या टाळ्या व हशे, तुमचे प्रेम मिळविण्यासाठी. बऱ्याचशा स्त्री कलाकारांना बरेचदा आपले दीड महिन्याचे तान्हं मुल घरी सोडुन नाटकासाठी बाहेर जावं लागत.

माझ्या बायकोने, सीमाने अजिंक्य दीड महिन्यांचा असताना १० दिवसांचा नाटकांचा दौरा केलाय. दौऱ्याला निघताना अजिंक्य झोपला होता. सीमा रडत होती . मी तिच्या आईची भेदक दृष्टी चुकवत होतो. रात्री ती रडायची. मी तिची समजुत काढत असे व ती माझी. माझ्या आईची चिता थंड होण्याआधी माझा असाच १५ दिवसांचा नाटकांचा दौरा होता त्यासाठी मी गेलो होतो... बाल गंधर्वाना नाटकाचा प्रयोग चालु होण्याच्या आधी फक्त दहाच मिनिटे आधी त्यांचा मुलगा गेल्याच कळलं. त्यांनी त्या नाटकाला... त्यांच्या गाण्याला नेहमीपेक्षा जास्त वन्स मोअर घेतले. हा निर्ढावलेपणा नाही तर जबाबदारी आहे. पुर्वी काय किंवा आता काय आमच्या नाटकांचे दौरे हिच आमची कमाई आहे, आमच जीवन आहे. दौऱ्याच्या वेळी तर प्रत्येक वळणावर मृत्यू आमची वाट पाहत असतो. तुमच्या साखर झोपेची वेळ. हीच सुंदर वेळ साधून मृत्यू आमच्यावर झडप घालतो. माझ्या माहिती प्रमाणे पहिली झडप शाहीर अमर शेखवर काळानं घातली....... काळाला ....... मृत्यूला जणु चटकच लागली ...... त्याच पहाटेच्या साखर झोपेच्या वेळी शांताबाई जोग, हार्डीकर व दोन बॅक स्टेज आर्टिस्ट यांच्यावर झडप घातली. खंदा आर्टिस्ट अरुण सरनाईक, त्याची पत्नी, मुलगा म्हणजे सगळं कुटुंब त्यान गिळंकृत केलं ...... भक्ती बर्वेला अलगद आमच्यातून उचलल. आमचे (माझी पत्नी व मी) पाच ॲक्सिडेंट झालेत त्यात दोन अपघातातून आम्ही कसे वाचलो ते परमेश्वरालाच माहीत ...... एकदा तर मृत्यूला मी समोर पा सेंकद पाहत होतो. आमच्या नाटकाच्या बसला अपघात झाला. ती बस तीनदा पुर्णपणे रोल झाली. आमच्या दोघांचा घास घेण्यासाठी मृत्यू आमच्याकडे अती वेगाने येत होता. परमेश्वराला आमच्या दोन्ही मुलांची काळजी ....... वाचलो ....... तुमच्या प्रेमामुळे वाचलो... हे सांगतोय ते माझ्या प्रिय रसिकांनो तुमची सहानुभुती मिळावी म्हणून नाही तर सत्य तुम्हाला कळाव म्हणून. अस पुष्कळ कलावंताच्या बाबतीत घडलय ....... घडत राहणार आहे ....... मात्र आमची रंगभूमीशी असलेली बांधिलकी कधीही संपणार नाही.